संकीर्ण

# ‘रेबिज’पासून सस्तन प्राण्यांचा असा करा बचाव




आर.पी. कोल्हे
(मो.नं. ९९७०४२५३८९)
व्ही.एस. वासकर
व्ही.डी. आहेर
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ, जि. सातारा








रेबिजची लक्षणे दिसायला लागल्यास प्राणी अथवा मानव यांचा जीव वाचविणे जिकिरीचे ठरते. उपचार न मिळाल्यास काही दिवसांनी असे आजारी प्राणी आणि व्यक्तीचा निश्चित मृत्यू होतो. म्हणूनच रेबिज आजारावर वेळीच उपचार करणे अनिवार्य आहे. श्वानांमध्ये रेबिजचे तीव्र आणि मूक असे दोन प्रकार दिसून येतात. तीव्र प्रकारातील रेबिजची लक्षणे असणारे श्वान सहसा मानव आणि प्राण्यांना चावत मोकाट पळतात. जोरजोरात भुंकणे, कुठल्याही वस्तूला चावणे, लाळ गाळत राहाणे, मेंदूवरील नियंत्रण सुटल्यामुळे आणि घशाचा अर्धांगवायू (पॅरालिसिस) झाल्यामुळे पाण्याची भीती तसेच हवेची सुद्धा भीती निर्माण होणे अशी लक्षणे दिसतात.

रेबिज हा विषाणूजन्य आजार असून जगभरातील जवळपास १५० देशांमध्ये आढळतो. आशिया खंडामधील भारतासारख्या अनेक देशांमध्ये हा आजार प्रामुख्याने पिसाळलेला कुत्रा चावल्याने मानवास होतो. तसेच श्वानांपासून आणि रेबिज असणाऱ्या इतर श्वापदांपासून हा आजार अनेक सस्तन प्राण्यांना होऊ शकतो. रेबिजमुळे होणाऱ्या मानवीय मृत्यूंचा २०३० पर्यंत संपूर्ण नायनाट करण्याच्या दृष्टिकोनातून जागतिक रेबिज दिवस साजरा करण्यात येतो. प्रत्येक वर्षी हा दिवस २८ सप्टेंबर या दिवशी साजरा करण्याचे कारण म्हणजे २८ सप्टेंबरला लुईस पाश्चर या वैज्ञानिकाची पुण्यतिथी असते. दि. २८ सप्टेंबर १८९५ रोजी लुईस पाश्चर यांचा मृत्यू झाला आणि २००७ पासून जगभरात त्यांची पुण्यतिथी जागतिक रेबिज दिवस म्हणून साजरी करण्यात येते. याच महान वैज्ञानिकाने ६ जुलै १८८५ रोजी श्वानदंश झालेल्या ९ वर्षीय जोसेफ मिस्टर नावाच्या मुलाला जगातील प्रथम रेबिज लस टोचली होती. लुईस पाश्चर यांच्यामुळेच आज आपण रेबिज आजारावर वेळीच उपचार केल्यास प्रतिबंध आणि नियंत्रण ठेवू शकतो.

**मृत्यूचे प्रमाण चिंताजनक :** जगभरात रेबिज आजारामुळे दरवर्षी जवळपास ५९,००० मानवी मृत्यू होतात. यामध्ये लहान मुलांचे प्रमाण जास्त आहे. रेबिज आजाराला कारणीभूत विषाणूची लागण झालेल्या म्हणजेच पिसाळलेल्या प्राण्यांच्या उदा. श्वान, मांजर, माकड, कोल्हा, लांडगा, तरस, मुंगूस आणि इतर जंगली श्वापदांच्या लाळेमधून या विषाणूचा संसर्ग होतो. साधारणपणे चावा घेतलेल्या जागेपासून मेंदूचे अंतर किती आहे यावर लाक्षणिक काळ अवलंबून आहे. रेबिज विषाणू मज्जातंतूंद्वारे पाठीच्या कण्यामधून मेंदूकडे प्रसार पावतो. मेंदूमधून विषाणू लाळग्रंथीमध्ये येतो आणि एकदा



लाळेमध्ये प्रसार झाल्यानंतर साधारणपणे ७ दिवसांमध्ये पिसाळलेल्या श्वानाचा मृत्यू होतो. त्यामुळेच दंश घेतलेला श्वान ओळखीचा असेल तर त्याला डॉक्टर १० दिवस नियंत्रणामध्ये ठेवून त्याच्यामध्ये रेबिजची लक्षणे दिसतात का याची खात्री करण्यास सांगतात. आशिया आणि आफ्रिका खंडामधील देशांमध्ये ८५-९५% रेबिजचे मानवी मृत्यू श्वानदंशाद्वारे होतात. एकट्या भारतामध्ये १८०००-२०००० मृत्यू रेबिजमुळे होतात आणि याची प्रमुख कारणे कुत्रा चावल्यानंतर त्वरित वैद्यकीय उपचार न घेणे, लसीकरण



अपूर्ण घेणे, अंधश्रद्धा ठेवून वेगळे उपचार घेणे इ. असू शकतात. भारतामध्ये रेबिजचा प्रादुर्भाव जास्त असल्यामुळे १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय रेबिज नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. श्वानदंशामधून रेबिजमुळे होणाऱ्या मानवी मृत्यूचा २०३० पर्यंत समूळ नायनाट करण्याच्या दृष्टिकोनातून रेबिज आजार निर्मूलनाचा राष्ट्रीय कृती आराखडासुद्धा देशपातळीवर तयार करण्यात येत आहे.

**विषाणूचा प्रसार :** रेबिज विषाणूचा संसर्ग प्रामुख्याने प्राण्यांच्या दंशापासून होतो आणि हा विषाणू लाळेमधून शरिरात पसरतो. तसेच विषाणूजन्य लाळ डोळे, नाक आणि तोंडामधील श्लेष्मल त्वचा अथवा जखम झालेल्या कातडीच्या संपर्कात आल्यास सुद्धा संसर्ग होऊ शकतो. याशिवाय रेबिज झालेल्या मानवाचे अवयव उदा. डोळ्यातील कॉर्निया प्रत्यारोपण केल्यास रेबिज होऊ शकतो. पिसाळलेल्या श्वानांपासून इतर श्वान आणि प्राण्यांना सुद्धा हा आजार होतो. मानवी शरीरात गेल्यानंतर रेबिज विषाणू मज्जासंस्थेमध्ये प्रवेश करतो आणि मेंदूकडे हळूहळू वाटचाल करतो. सर्वसाधारणपणे या विषाणूची गती ८ ते २० मिलीमीटर प्रतिदिवस असते आणि त्यामुळेच या आजाराचा

लाक्षणिक काळ चावा घेतलेल्या जागेवर अवलंबून असतो.

**आजाराची लक्षणे :** चाव्याची जखम मेंदूपासून किती दूर आहे यावरून लाक्षणिक काळ काही आठवडे ते अनेक महिनेसुद्धा असू शकतो. बाधित व्यक्तीमध्ये साधारणपणे चावा घेतलेल्या ठिकाणी जळजळ होणे, खाज सुटणे, आळस, गोंधळून जाणे, विसर पडणे, मेंदूवरील ताबा सुटणे,



स्मृतिभ्रंश होणे, प्रलाप, उत्तेजित होणे, असामान्य वर्तन करणे, अर्धांगवायू, पाण्याची भीती निर्माण होणे इ. असू शकतात. रेबिजची लक्षणे दिसायला लागल्यास प्राणी अथवा मानव यांचा जीव वाचविणे जिकिरीचे ठरते. उपचार न मिळाल्यास काही दिवसांनी असे आजारी प्राणी आणि व्यक्तीचा निश्चित मृत्यू होतो. म्हणूनच रेबिज आजारावर वेळीच उपचार करणे अनिवार्य आहे. श्वानांमध्ये रेबिजचे तीव्र आणि मूक असे दोन प्रकार दिसून येतात. तीव्र प्रकारातील रेबिजची लक्षणे असणारे श्वान सहसा मानव आणि प्राण्यांना चावत मोकाट पळतात. जोरजोरात भुंकणे, कुठल्याही वस्तूला चावणे, लाळ गाळत राहाणे, मेंदूवरील नियंत्रण सुटल्यामुळे आणि घशाचा अर्धांगवायू (पॅरालिसिस) झाल्यामुळे पाण्याची भीती तसेच हवेची सुद्धा भीती निर्माण होणे अशी लक्षणे दिसतात.

यावर्षी जागतिक रेबिज दिवसाचे उद्दिष्ट होते Rabies: Facts, not fear म्हणजे श्वानदंश : तथ्य ओळखा, घाबरू नका. यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि इतर अनेक आंतरराष्ट्रीय संस्था खालील ध्येय ठेऊन कार्य करीत आहेत–

१. श्वानजन्य रेबिजच्या निर्मूलनासाठी आवश्यक ज्ञान, रणनीती आणि साहित्य सामग्रीची सांगड घालणे.

२. उपयुक्त साधने आणि यशस्वी दृष्टिकोनातून रेबिज आजाराचे प्रतिबंध, नियंत्रण आणि निर्मूलन करणे.

३. मानवी जीव वाचवण्याकरिता रेबिज आजाराबद्दल जनजागृती करणे आणि रेबिज प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा शैक्षणिक प्रसार करणे.

**उपचार आणि प्रतिबंध :** जागतिक आरोग्य संघटनेच्या निर्देशांप्रमाणे दंश झालेली जखम सर्वप्रथम विनाविलंब स्वच्छ पाणी आणि साबणाने किमान १५ ते २० मिनिटे धुवावी, जेणेकरून त्या जागेवरील विषाणू शरीरामध्ये प्रवेश करणार नाहीत. त्यानंतर लगेच वैद्यकीय उपचार घ्यावेत. वैद्यकीय उपचारांमध्ये जखमेचा प्रकार बघून डॉक्टर रेबिज प्रतिबंधक लस आणि इम्युनोग्लोब्युलिन्सचे इंजेक्शन देतात. प्रमाणित वेळापत्रकाप्रमाणे लसीकरण करणे अनिवार्य आहे.

मानवामध्ये लसीकरण त्वचेच्या खाली (इंट्राडर्मल) अथवा स्नायूंच्या खाली (इंट्रामस्कुलर) या दोन प्रकारे देतात. थाई रेडक्रॅास मानकांप्रमाणे इंट्राडर्मल शेड्युलमध्ये एका वेळेस २ इंजेक्शन्स याप्रमाणे ८ इंजेक्शन ०, ३, ७ आणि २८ व्या दिवशी देतात. इंट्रामस्कुलर लसीकरण वेळापत्रकानुसार ०, ३, ७, १४ आणि २८ व्या दिवशी अशी पाच इंजेक्शन्स स्नायूंच्या खाली देतात. शून्य दिवस म्हणजे ज्या दिवशी पहिले इंजेक्शन घेतले तो दिवस गृहीत धरतात.

**लसीकरण करणे गरजेचे :** काही लोक प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विषाणूची लागण टाळण्यासाठी अगोदरसुद्धा लस घेऊ शकतात. ही लस प्रामुख्याने पशुवैद्यकीय डॉक्टर्स, श्वान प्रजनन नियंत्रण आणि रेबिज लसीकरण करणाऱ्या व्यक्ती आणि रेबिज प्रयोगशाळेत काम करणाऱ्या व्यक्तीच घेऊ शकतात. याला प्रि–एक्सपोजर लसीकरण म्हणतात आणि प्रमाणित वेळापत्रकाप्रमाणे याचे ३ इंजेक्शन ०, ७, आणि २१ अथवा २८ व्या दिवशी देतात.

श्वान आणि मांजरांना प्रि–एक्सपोजर लसीकरण करणे अनिवार्य आहे, जेणेकरून भविष्यात त्यांना रेबिज विषाणूंची लागण होणार नाही यासाठी पशुवैद्यकांकडून पाळीव श्वान आणि मांजरांना नियमित लसीकरण करावे. श्वानांना सर्वसाधारणपणे ३ महिने वयाचे असताना पहिले इंजेक्शन देतात आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी बूस्टर इंजेक्शन देतात. उत्कृष्ट प्रकारच्या रेबिज प्रतिबंधात्मक लसी उपलब्ध आहेत. लसीकरण करण्यापूर्वी पाळीव प्राण्यांचे जंतनिर्मूलन करावे. सन २०३० पर्यंत रेबिज निर्मूलन आणि नियंत्रण करण्याच्या दृष्टिकोनातून आपण सर्वांनी एकत्रित आणि संघटितपणे जनजागृती करणे आणि रेबिज प्रतिबंधक उपाययोजनांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. ■